■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी  एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ४८ ● मंगळवार, दि. १५ ते २२ एप्रिल २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रु

## शिवसेना(शिंदे गट) अल्पसंख्यांक शहराध्यक्षपदी खाजाभाई यांची नियुक्ती

रिसोड शहरातील राजकारणात मुस्लिम समाजातून नामांकित व्यक्ती म्हणून तसेच माजी उपाध्यक्ष नगरपालिका रिसोड म्हणून नगरपालिकेत एक कार्यकाळ गाजविणारे शेख खाजा शेख फरीद यांची नियुक्ती आमदार भावना गवळी यांनी अल्पसंख्यांक शहराध्यक्ष म्हणून या पदावर केलेली आहे.

सन १९९८ मध्ये अपक्ष म्हणून नगरपालिकेत निवडून आलेले व उपाध्यक्ष म्हणून राहिलेले तसेच त्यानंतर २०१९ मध्ये नगराध्यक्षाची जनतेतून निवडणूक लढवून पाच हजार मते घेऊन शहरातच नव्हे तर जवळपास संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरलेले वंचित चे उमेदवार म्हणून त्यांचे नाव चर्चेत होते. त्यावेळी अल्पशा मताने दुसऱ्या क्रमांकावर राहून सर्व राजकीय मातंबरांना व नेत्यांना त्यांनी घाम फोडला होता. संपूर्ण समाज सोबत घेऊन व समाजाचे व्यतिरिक्त इतर समाजात घनिष्ठ संबंध प्रस्थापित करून त्यांनी त्यावेळेस नगराध्यक्षाची थेट जनतेतून निवडणूक लढवली होती. इतर समाजात त्यांची राजकीय पकड चांगली आहे. हा सर्व राजकीय इतिहास डोळ्यासमोर ठेवून भावना गवळी यांनी त्यांच्यावर शिवसेना अल्पसंख्यांक शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली.सदर पदाला मी योग्य ते न्याय देऊन या पदाचा सर्व समाजासाठी व अल्पसंख्याकांसाठी अहोरात्र मेहनत करून न्याय देण्याचा प्रयत्न करीन असे त्यांनी आपले मनोगत बोलून दाखविले.



## पत्रकारांना मंत्रालयात दुपारी २ वाजेनंतर प्रवेशाचे निर्देश पत्र रद्द

मुंबई, दि. ७ : विविध दैनिक, वृत्तवाहिन्यांचे पत्रकार व प्रतिनिधींना प्रवेशासाठी त्यांचे ओळखपत्र (आरएफआयडी कार्ड) व सर्व सुरक्षा विषयक तपासणी करून दुपारी २ वाजेनंतर मंत्रालयात प्रवेश देण्यात यावा, असे निर्देश पत्र २४ मार्च २०२५ रोजी निर्गमित करण्यात आले होते. पत्रकारांना मंत्रालयात प्रवेशाबाबतचे हे निर्देश गृह विभागाकडून रद्द करण्यात आले आहे, असे कक्ष अधिकारी डॉ. प्रविण ढिकले यांनी कळविले आहे.

## पुष्पादेवी पाटील महाद्यिालयात पदवीदान समारंभ



रिसोड : येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये पदवीदान व गुणवंत विद्यार्थी पारितोषिक समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जीवन विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबाराव पाटील यांनी भूषविले.तर प्रमुख अतिथीस्थान प्राचार्य डॉ. विजयराव नागरे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व्यवस्थापन आणि अधिसभा सदस्य यांनी भुषविले.

या प्रसंगी मंचावर जीवन विकास शिक्षण संस्थेचे सचिव मा.अमित पाटील,प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड व डॉ. गणेश घुगे यांची उपस्थिती होती. वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व विद्यापीठ गीताने या कार्यक्रमाची रीतसर सुरुवात करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते २०२३-२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या बी.ए व बी.एससीच्या ८० विद्यार्थ्यांना पदवीचे वितरण व ५० गुणवंतांना पारितोषिक वितरण या प्रसंगी करण्यात आले.प्रास्ताविकातून प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना पदवीदान व गुणवंत पारितोषिकांचे वितरण कार्यक्रम आयोजनाचा हेतू ,उद्देश् सांगून महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या गुणगौरवाचा ओझरचा उल्लेख केला. संस्थाध्यक्ष मा. बाबाराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सकारात्मक विचार व आत्मविश्वास अंगी बाळगून पाया मजबूत करावा. वैचारिक बैठक पक्की केल्यानंतर सकारात्मक मानसिकतेने कुठल्याही अडचणींना सामोरे जाऊन यशापर्यंत निश्चितच पोहोचता येते असे मत प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. विजयराव नागरे यांनी शैक्षणिक धोरणामुळे भावी काळात सुसंस्कृत वर्ग निर्माण होईल. नदी ज्याप्रमाणे समुद्राचे ध्येय ठेवून निरंतर वाहते तशी विद्यार्थ्यांनी सारासार विवेक ठेवून वाटचाल केल्यास भारताचे उज्वल भविष्य घडेल असे मत व्यक्त केले. मा.अमित पाटील यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नपूर्तीसाठी भविष्याचा वेध घेत मार्गक्रमण करताना क्षण वाया न घालवता ज्ञानाचा संचय केला पाहिजे केला पाहिजे असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. डॉ. गणेश घुगे यांनी मराठा इतिहासातील प्रेरणास्थाने सांगितली. सूत्रसंचलन डॉ.श्रीहरी पितळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. केशव कोकाटे यांनी केले. विद्यापीठ गीताने समारंभाचा प्रारंभ व राष्ट्रगीताने शेवट झाला. वि.प्र.

## भूमीपूत्र शेतकरी संघटनेची गुरुवारी आढावा बैठक



वाशीम : भूमीपूत्र शेतकरी संघटनेची कारंजा, मानोरा व मंगरुळपीर तालुक्याची आढावा बैठक १७ एप्रिल रोजी आयोजीत केली आहे. तरी सर्व,पदाधिकाऱ्यांनी आढावा बैठकीला उपस्थित राहावे,असे आवाहन भुमिपुत्रचे कारंजा तालुका अध्यक्ष देवेंद्र पाटील लांडकर यांनी केले आहे.

या बैठकीमध्ये शेतकऱ्यांची कर्जमाफी, रखडलेला पिक विमा,शेतकऱ्यांची विजजोडणी या संदर्भात आढावा बैठकीमध्ये चर्चा करण्यात येणार आहे. तसेच सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी देवू असे आश्वासन दिले होते. परंतु कर्जमाफी झाली नाही. शतकऱ्यांनी सरकारच्या आश्वासनामुळे व नापिकीमुळे शेतकऱ्यांना कर्ज भरता आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळणार नाही. पीक कर्ज न मिळाल्यास शेतकरी खरीपातील पेरणी करू शकणार नाही. शेतकरी आत्महत्या वाढण्याची भीती निर्माण झालेली आहे. त्यामुळे कर्जमाफीसाठी आदोलनाची रूपरेषा ठरवण्यात येईल. तसेच नविन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. या बैठकीसाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक तथा रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विष्णूपंत भुतेकर, जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, राज्य महिला समन्वयक डॉ. तृप्तीताई गवळी,सतोष सुर्वे, देव इंगोले, सौ. संगीताताई मार्गे,सचिन काकडे,बालाजी बोरकर,देवेंद्र लांडकर,भूषन मुराळे, विलासराव गहूले,सतीष मालवे, वंदनाताई कांबळे, पंकज इंगळे, तुषार गांवडे, अभिजित जाधव, रवि लाहे यांची आढावा बैठकीला उपस्थिती राहणार आहे. तरी कारंजा, मानोरा, मंगरूळपीर तालुक्यातील भूमिपुत्रच्या सर्व पदाधिकाऱ्यानी व शेतकऱ्यांनी सकाळी ११.३० ला शासकीय विश्राम गृह कारंजा येथे उपस्थित रहावे असे, आवाहन भूमिपूत्रचे कारंजा तालुका अध्यक्ष देवेंद्र पाटील लांडकर यांनी केले आहे.

## कायाकल्प मूल्यांकन समितीची रिसोड ग्रामीण रुग्णालयाला भेट

### रुग्णसेवेत दर्जा राखल्याबद्दल कौतुक

**रिसोड, दि.३ प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कायाकल्प अभियानांतर्गत, रुग्णालयातील स्वच्छता, सुरक्षितता, पर्यावरणीय व्यवस्थापन आणि रुग्णसेवा याचे मूल्यांकन करण्यासाठी कायाकल्प राष्ट्रीय मूल्यांकन समितीने आज रिसोड ग्रामीण रुग्णालयाची अधिकृत भेट घेतली. या समितीमध्ये डॉ. गुडे, डॉ. कुटीवार (राष्ट्रीय मूल्यांकन तज्ज्ञ), डॉ. कुव्हडि (जिल्हा गुणवत्ता मूल्यांकन अधिकारी) हे प्रमुख पाहुणे म्हणून




उपस्थित होते.

या भेटीदरम्यान तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत पवार, तसेच वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य सहाय्यक, क्लिनिंग स्टाफ आणि इतर प्रशासनिक कर्मचारी उपस्थित होते. समितीने दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता रुग्णालयास भेट देऊन संपूर्ण दैनंदिन कामकाजाची पाहणी केली.

पाहणी दरम्यान केलेली मूल्यमापन तपासणी: स्वच्छता आणि हायजिन पद्धतींची अंमलबजावणी, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन रुग्णांच्या फीडबॅकची प्रणाली सुरक्षित प्रसूती सेवा व नवजात शिशु काळजी केंद्र (NBCC) आपत्कालीन सेवा, औषध वितरण केंद्र, प्रसूतिगृह, ऑपरेशन थिएटर इ. प्रशिक्षण व गुणवत्ता वाढीसाठी कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रम फायर सेफ्टी, इन्फेक्शन कंट्रोल, जल व्यवस्थापन समितीची प्रतिक्रिया:राष्ट्रीय तज्ज्ञ डॉ. कुतीवार यांनी रुग्णालयातील आरोग्य सेवांचा दर्जा, स्टाफची कार्यनिष्ठा व रुग्ण केंद्रित दृष्टिकोनाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, "कायाकल्प हा केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित नसून एकूण आरोग्यसेवेत गुणवत्ता आणण्याचा उपक्रम आहे. रिसोड ग्रामीण रुग्णालयाने हे उद्दिष्ट चांगल्या प्रकारे पूर्ण केले आहे."

रुग्णालय प्रशासनाची भूमिका:डॉ. प्रशांत पवार यांनी सांगितले की, "संपूर्ण टीमच्या सहकार्यामुळे आणि नियमित मूल्यांकन प्रक्रियेमुळे रुग्णालयात सातत्याने सुधारणा होत आहेत. रुग्णसेवेचा दर्जा टिकवणे हेच आमचे प्रमुख ध्येय आहे." त्यांनी कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानले.

येत्या काळात पुढील पावले: स्थानिक स्तरावर जनजागृती मोहीम डिजिटल हेल्थ रेकॉर्ड्स व मॉडर्न सुविधांचा समावेश या भेटीद्वारे कायाकल्प प्रमाणपत्रासाठी रिसोड ग्रामीण रुग्णालयाचे मूल्यांकन सकारात्मक दिशेने झाले असून, अंतिम अहवाल नजीकच्या काळात प्राप्त होईल. या उपक्रमामुळे ग्रामीण जनतेला अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## संपादकीय

# आणखी एक बोजा

इंधनाच्या दरात करण्यात आलेली उत्पादन शुल्काची वाढ, गॅस सिलिंडरच्या दरात झालेली वाढ, पाइप गॅसच्या दरात झालेली वाढ, या सगळ्या दरवाढीच्या बातम्या एकापाठोपाठ एक आल्यानंतर लोकांवर आणखी एक बोजा सरकारने टाकला आहे. हा बोजा म्हणजे सहकारी सोसायटीमध्ये राहणार्‍या सभासदांच्या मेंटेनन्सवर नव्याने आकारल्या जाणार्‍या जीएसटीचा आहे. शहरी मध्यमवर्गीयांसाठी हा दणका मोठा आहे. शहरी मध्यमवर्गीय ज्या सोसायट्यांमध्ये राहतात त्या सोसायटीतील देखभाल खर्चासाठी ते दरमहा काही पैसे मेंटेनन्स म्हणून भरतात. या मेंटेनन्सवर आता तब्बल १८ टक्के जीएसटी लागू केला जाणार आहे. आता खरं म्हणजे ही लोकांनी कपाळावर हात मारून घ्यावी अशी बाब आहे. या आधीच देशातील सर्व नागरिक ब्रँडेड आटा, पनीर, दही अशा वस्तूंपासून जवळपास सगळ्याच वस्तूंवर वेगवेगळ्या टप्प्यातील जीएसटी भरत असतो. वह्या, पेन्सिल, दप्तरे अशा शालेय शैक्षणिक साहित्यावर पण जीएसटी लागूच आहे. सर्वच प्रकारच्या सेवांवरसुद्धा जीएसटी लागू आहे, फक्त सोसायट्यांचा मेंटेनन्स हा एकच विषय राहिला होता, सरकारची नजर आता त्याच्यावरही पडली आहे. हे सरकार देशातील जनतेला सळो की पळो करून सोडत आहे असेच चित्र दुर्दैवाने दिसते आहे. जनतेला दिलासा देणारी कोणतीही बाब किंवा निर्णय सरकारकडून घेतला जात नाही, किंबहुना जनतेला आता सरकारकडून कोणतीच आशा उरलेली नाही. देशाच्या भीषण आर्थिक व्यवस्थेचा फटका या आधीच जनसामान्यांना बसलेला आहे. बेरोजगारीचा दर गेल्या पन्नास वर्षातील उच्च अंकी पातळीवर आहे, नागरिकांचे उत्पन्न घटते आहे, कुठल्याच क्षेत्रात अपेक्षित पगारवाढ होताना दिसत नाही. यामुळे अत्यंत घायकुतीला आलेला गरीब आणि मध्यमवर्ग आपले दैनंदिन जीवन कसेबसे रेटत असताना केंद्र सरकारने अलीकडे हे धक्क्यामागून धक्के दिले आहेत. सरकार जनसामान्यांचा कुठल्याच दृष्टीने का विचार करत नसावे हे कोडे अजिबात उलगडत नाही. प्रसारमाध्यमांवर याची जरासुद्धा चर्चा होताना दिसत नाही. वास्तविक सरकारने स्वतःचे नुकसान करून न घेता आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे जे दर घसरले आहेत त्याचा लाभ जनतेला करून देणे सहज शक्य असताना सरकारने मात्र इंधनावरील उत्पादन शुल्कात वाढ करून जो लाभ नागरिकांना मिळणे अपेक्षित होता त्यात सरकारने स्वतःच हात धुऊन घेतल्याचे पाहायला मिळाले आहे.

हे कथानक आजवर आपण इतक्या वेळा ऐकले आहे की देशातील इंधनाचे भाव कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय दरावर ठरतात, मग हे जर असे असेल तर कच्च्या तेलाचे भाव उतरल्यानंतर त्याचा जनतेला लाभ का होत नाही, इंधनावर उत्पादन शुल्क लावून जनतेला होणारा हा लाभ सरकार परस्पर का काढून घेते, हा प्रश्न मोदी सरकारच्या काळात वारंवार पडतो आहे. इंधनावरील उत्पादन शुल्कात करण्यात आलेल्या वाढीतून केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत ३५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिकची रक्कम वसूल केली आहे. म्हणजे याचाच अर्थ कच्च्या तेलाच्या किमती घसरल्याने जनतेच्या खिशात जे ३५ लाख कोटी रुपये जाणार होते ते सरकारने परस्पर काढून घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचे भाव आणि देशातील पेट्रोल, डीझेलचे दर यावर आता कोणीच चर्चा करताना दिसत नाही किंबहुना ती चर्चाच होऊ दिली जात नाही.

## ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ

मुंबई - राज्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. याबाबत अध्यादेश काढण्यास बैठकीत मंजूरी देण्यात आली.

राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या परंतु जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने सदस्यत्व रद्द झालेल्या सदस्यांना प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी अनेक लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली होती.

त्यानुसार ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या एक ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर अध्यादेश जारी होईपर्यंत झालेल्या सर्वसाधारण निवडणुका अथवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणि त्या अनुषंगिक बाबींसाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास तात्पुरती मुदतवाढ अध्यादेश, २०२५ काढण्यास मान्यता देण्यात आली.

## 'आपले सरकार' पोर्टलची सेवा पाच दिवस बंद

मुंबई, दि. ८ : 'आपले सरकार' पोर्टलची सेवा नियमित व तांत्रिक देखभालीसाठी १० ते १४ एप्रिल, २०२५ अशी पाच दिवस बंद राहील. या कालावधीत 'आपले सरकार' सेवा पोर्टलमार्फत दिली जाणारी कोणतीही सेवा उपलब्ध असणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## हनुमान जयंती निमित्त महाप्रसादाचे वितरण

रिसोड : तालुक्यातील भोकरखेडा येथे .१२ मार्च रोजी रिसोड तालुक्यातील भोकरखेडा येथे १२ एप्रिलला रोजी मोठ्या उत्सवात हनुमान जयंती निमित्त तसेच शेतशिवारातील पांढरी वरच्या हनुमान संस्थान जवळ महाप्रसादाचे वितरण करण्यात आले असून गावातील तसेच बाहेर गावातील भाविकांनी मोठ्या संख्येने महाप्रसादाचा



लाभ घेतला. हनुमान मंदिराचे समोर शेकडो वर्षांपासून हनुमान जयंती निमित्त दर वर्षी भागवत सप्ताहासह व महप्रसादाचे गावकर्यांच्या वतीने आयोजन करण्यात येत असून येथे हनुमान जयंतीनिमित्त स्पताहामध्ये कि किर्तन भजन अभंग भारुड व नगर सात दिवसाच्या सप्ताह मध्ये अन्नदाते करतात या ठिकाणी नवस फेडण्यासाठी नवसाचा मारुती म्हणूनओळखल्या जाते महाप्रसादचे वाटप केले असून गावातील अनेक भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. श.प्र.






**पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक)** | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानेरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. अॅक्ट नुसार संपादक जबाबदार)

# पाटील महाविद्यालयात समता सप्ताहा निमित्त व्याख्यान

रिसोड : स्थानिक स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' निमित्त विविध विषयावरती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. आदिनाथ बदर यांच्या उपस्थितीत या सप्ताहचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड यांनी याप्रसंगी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यावर आपले विचार व्यक्त केले. या व्याख्यानमालेत पहिल्या सत्रामध्ये मध्ये डॉ. अतुल खोटे यांनी संविधान जागरण या विषयावरती मार्गदर्शन केले. डॉ. खोटे, यांनी भारतीय संविधानाविषयी सर्वसाधारण माहिती देऊन संविधानाची निर्मिती, अनुच्छेद विशेषताः मूलभूत अधिकार व मूलभूत कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ.



सिद्धार्थ इंगोले यांनी डॉ. आंबेडकर यांचे महिला विषयक विचार या विषयावरती मार्गदर्शन केले. तसेच प्रा. डॉ. प्रकाश हनवते यांनी डॉ. आंबेडकरांचे शेती विषयक विचार यावर मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. प्रकाश हनवते यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. केशव कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. (वि. प्र)

# निजामपूर शाळेत वृक्ष संवर्धन मोहीम

रिसोड : तालुक्यातील निजामपूर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रीय शाळेत शाळा व्यवस्थापन समिती व शाळेच्या वतीने वृक्ष संवर्धन मोहीम राबविण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याद्यापक अर्जुन वरघट यांनी 'मरावे परी वृक्षरुपी उरावे'या उक्तीप्रमाणे प्रत्येकाने आपल्या घरी, परिसरात,परसबागेत,शेताच्या बांधावर, दुतर्फा रस्त्याच्या कडेने झाडे लावून ती जगविली पाहिजेत, असे आवाहन केले. तर, वृक्ष स्वतः उन्हात उभे राहतात व आपल्याला सावली व



प्राणवायू देतात. असे मनोगत मेघशाम पत्रे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी एक वर्ग चार कुंड्या उपक्रम राबविण्यात आला. शाळेत विविध वृक्ष व फुलझाडे लावलेली असून विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेतली व त्यांची देखभाल व निगराणी करण्याची जबाबदारी घेतली. गावात लग्न झालेल्या नवदाम्पत्यांकडून देखील परिसरात एक झाड लावून घेतले जाते. सदर वृक्षसंवर्धन मोहीम शिक्षक अरविंद इंगोले, पुष्पा संबळे, धीरज जाधव, प्रमोद वाबळे व वृक्ष प्रेमी विद्यार्थ्यांनी यांच्या वतीने राबविण्यात येत आहे.

# सुरक्षेच्या उपाययोजनांनंतर संग्रहालय जनतेसाठी खुले

वाशिम,दि.८ एप्रिल (जिमाका) ५ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आलेल्या संग्रहालयास सुरक्षेच्या कारणास्तव एसपीजी कडून पूर्णपणे मॅन्युअल पद्धतीने कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या सूचनेनुसार संपूर्ण म्युझियमची ऑटोमॅटिक प्रणाली तात्पुरती थांबवून मॅन्युअल पद्धतीने चालवण्यात आली होती. यानंतर पुन्हा एकदा संपूर्ण प्रणालीचे ऑटोमॅटिक प्रोग्रामिंग करून ती सुरळीत कार्यान्वित करण्यात आली. याच कालावधीत आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे ऑपरेशन आणि मेंटेनन्ससाठी निविदा प्रक्रिया सुरु करणे शक्य झाले नाही. तथापि, सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय बाबी पूर्ण करून संग्रहालय फेब्रुवारी २०२५ मध्ये नागरिकांसाठी विनामूल्य खुले करण्यात आले. त्यानंतर दोन महिने संग्रहालयाची कार्यप्रणाली ट्रायलच्या माध्यमातून चाचपणी करून अधिक कार्यक्षम करण्यात आली. सदर विलंब हा पूर्णतः सुरक्षेच्या गरजा व तांत्रिक समायोजनामुळे झाला होता, व जनतेसाठी अधिक सुरक्षित आणि अनुभवसमृद्ध संग्रहालय उभे करण्यासाठी हे पावले उचलण्यात आली होती.असे का कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम यांनी खुलास्याद्वारे कळविले आहे.

# चोरांच्या बंदोबस्तासाठी व्यापाऱ्यांची तिसऱ्या डोळ्याला पसंती

## ग्रामीण भागात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वाढला वापर

रिसोड : शहरासह,तालुक्यामध्ये शासकीय कार्यालये, दुकाने, मोबाइल शॉप, जनरल स्टोअर्स, कापड दुकाने, राष्ट्रीयी कृत बँका, खासगी संस्थांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे.यामुळे अनुचित प्रकाराला आळा बसत असून चोरीच्या घटनेतील आरोपींना पकडण्यात पोलिसांना मदत मिळत आहे.

सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या किंमती आवाक्यात असल्याने दुकानदारांकडून आपल्या आस्तापनामध्ये सीसीटीव्ही प्रणाली बसविण्याला प्राधान्य दिले जात आहे. सीसीटीव्ही सिस्टीमच्या दर्जानुसार त्यांच्या किंमती ठरविण्यात आलेल्या आहेत. ३० हजार रुपयांपासून ते दोन लाख रुपयांपर्यंत कॅमेरे बाजारात उपलब्ध आहेत. सण उत्सवाचे दिवस असो वा, लग्नसराई सारख्या



दिवसामध्ये दुकानांत ग्राहकांची खरेदीसाठी मोठी गर्दी असते. आशा गर्दीचा गैरफायदा घेत चोरटे चोरी करत असल्याने व्यापाऱ्यांना ग्राहकांची काळजी घेत चोरट्यांवर देखील लक्ष ठेवावे लागते. दुकानात सीसीटीव्ही कॅमेरा असेल तर, व्यापाऱ्यांना त्रास कमी होतो. दुकानाच्या कामकाजाचे संपूर्ण चित्रीकरण होत असल्याने चोरट्यांवर लक्ष ठेवणे सहज शक्य होत आहे. शहरासह तालुक्यातील चोऱ्या, दरोडे आशा घटनांत वाढ झाल्याने व्यापाऱ्यांनी सुरक्षिततेची काळजी घेत दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याला प्राधान्य दिले जात आहे.




# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान

## रिसोड तालुक्यात मंडळ निहाय शिबीराचे होणार आयोजन

रिसोड : तालुक्यातील नागरिकांना कळविण्यात येते की, महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांची निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी रिसोड तालुक्यात मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करणेबाबत शासनाचे निर्देश आसल्याची माहीती तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांनी दिली आहे.



वाशीम जिल्हाधिकारी, यांनी 'गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण' या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्हयास मिळणाऱ्या नियतव्ययाच्या प्रमाणात कोणताही बदल न करता महसुली क्षेत्रिय कार्यालयाकडून जनतेस सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' रिसोड तालुक्यातील मंडळ स्तरावर आयोजित करणे, हा सातवा घटक म्हणून सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षापुरता समाविष्ट करण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासनाने मंजूरी दिलेली आहे.

तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर वर्षातुन किमान चार वेळा 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्यात यावेत. यामध्ये ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड वाटप, सामाजिक लाभाच्या योजना जसे, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना इ. महसूल विभागाशी संबंधीत विविध प्रमाणपत्रांचे वाटप, प्रमाणपत्राबाबत जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढण्यात येऊन मंडळ स्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' आयोजित करुन त्यामध्ये विविध महसूली दाखले, जनतेच्या तक्रारीचे निवारण तथा मार्गदर्शन करुन महसूली प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, व गतिमान करण्याच्या अनुषंगाने प्रयत्नशील रहावे. चोखपणे पार पाडावी असे तहसिलदार सिपेड यांचे निर्देश आहेत. ता. प्र.

# बाबाराव पाटील खडसे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## अभिष्टचिंतन सोहळयामध्ये सर्वपक्षीय व सर्वसामान्यांचा सहभाग



रिसोड : वाढदिवस ही एक आनंदाची पर्वणी असते ती कुठे साजरी होते त्याला तेवढच महत्त्व असते शरद पवार यांच्या विचारांचा वसा आणि वारसा चालवणारे, अभ्यासू, उच्चशिक्षित, आक्रमक आणि पुरोगामी विचारांची मुलुख मैदानी तोफ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या जनसंपर्क कार्यालयावर रिसोड तालुक्यातील नव्हे तर जिल्हाभरातून सर्वपक्षीय पदाधिकारी यांनी भेट देऊन अभिष्टचिंतन सोहळयामध्ये सहभाग नोंदविला आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी वाशिमचे जिल्हाध्यक्ष तसेच सहकार नेते व शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक असणारे जीवन विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबाराव पाटील यांचा ७३ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

बाबाराव पाटील यांनी विविध क्षेत्रातील गोरगरीब व्यावसायिक शैक्षणिक व राजकीय लोकांना कोणतेही जातीपातीचे राजकारण न करता विविध माध्यमातून मदत केलेली आहे. त्याची पावती म्हणून बाबाराव पाटील यांना वाढदिवसानिमित्त त्यांच्या त्यांनी संपर्क कार्यालयामध्ये येऊन सर्वपक्षीय सर्व जातीय व सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या पक्षीय राजकारण मनात न ठेवता, राजकीय भिंती ओलांडून सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक मंडळी यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांनी उदंड दीर्घायुष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. बाबाराव पाटील यांना उदंड आयुष्य लाभून त्यांच्या कार्यकर्तृत्वाची वेल अशीच आणखी बहरत राहो अशा शुभेच्छा देत सर्वांनी या आनंदाच्या क्षणात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी सत्काराला उत्तर देताना मा. बाबाराव पाटील यांनी आपण सर्वांनी अत्यंत उत्साह आणि आनंदाने या सोहळयात सहभाग घेतला. आपल्या सर्वांकडून मिळालेले हे प्रेम, जिव्हाळा अंतकरणात कायम घर करून राहील. आपल्या सर्वांच्या शुभेच्छाच्या बळावरच आजपर्यंत चालत आलेली वाटचाल निश्चितच पुढेही आणखी चांगल्या पद्धतीने होत राहील अशी ईश्वराकडे प्रार्थना केली. सर्वांनी दिलेल्या प्रेमपूर्वक शुभेच्छांनी निश्चितच सत्कार्य करण्याची सदोदित प्रेरणा मिळत राहणार आहे अशी भावना व्यक्त केली.

या वेळी विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक शेतकरी कष्टकरी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये भेट देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. (वि. प्र)



# संत तुकाराम महाराज विद्यालय तालुक्यात प्रथम

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम

रिसोड : रिसोड पंचायत समिती शिक्षण विभाग व जिल्हा परिषद शाळा सवड यांच्या वतीने 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत जिल्हा व तालुका स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय पुरस्कार मिळालेल्या शाळा व मुख्याध्यापक यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले.

या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्तव्यदक्ष प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. विठ्ठलराव भुसारी, प्रमुख पाहुणे कर्तव्यदक्ष मा. गटविकास अधिकारी किशोर लहाने, गटशिक्षणाधिकारी बद्रीनारायण कोकाटे गजाजनराव बाजड गटशिक्षणाधिकारी, कडाळे डायट व्याख्याता हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रिसोड तालुक्यातील खाजगी व्यवस्थापन गटामधून प्रथम येण्याचा मान कंकरवाडी येथील संत तुकाराम महाराज विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाला मिळाला. यावेळी विठ्ठलराव भुसारी शिक्षणाधिकारी प्राथमिक व मान्यवरांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन शाळा व मुख्याध्यापक साहेबराव जाधव यांचा सत्कार करण्यात आला. निजामपूर केंद्राचे केंद्रप्रमुख मेघशाम पत्रे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रिसोड तालुक्यातील 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' सर्व पात्र ठरलेल्या शाळा व मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी बद्रीनारायण कोकाटे यांनी केले. यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठलराव भुसारी यांनी मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले. रिसोड तालुका खासगी व्यवस्थापनामधून शाळेला प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक साहेबराव जाधव यांनी मान्यवरांचे आभार मानले. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकृष्णजी ढेकळे, शाळासचिव सरस्वती लोंढे (माजी केंद्रप्रमुख तथा शिक्षणविस्तारअधिकारी), संचालक सुनील ढेकळे, शाळेचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी सर्व शालेय पदाधिकारी यांना देतात. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजयजी साखरे तर आभार प्रदर्शन जिल्हा परिषद शाळा सवडचे मुख्याध्यापक सपकाळ यांनी केले. यावेळी सर्व केंद्रांचे केंद्रप्रमुख, शिक्षण अधीक्षक मुकुंद नायक, जिल्हा परिषद शाळेचे सर्व मुख्याध्यापक, तसेच गट साधन केंद्राचे सर्व कर्मचारी, विविध संघटनाचे पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, बहुसंख्य शिक्षक, शिक्षिका याप्रसंगी उपस्थित होते. श.प्र.

### कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षकांचीउपस्थिती

यावेळी सर्व केंद्रांचे केंद्रप्रमुख, शिक्षण अधीक्षक मुकुंद नायक, जिल्हा परिषद शाळेचे सर्व मुख्याध्यापक, तसेच गट साधन केंद्राचे सर्व कर्मचारी, विविध संघटनाचे पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, बहुसंख्य शिक्षक, शिक्षिका याप्रसंगी उपस्थित होते. शाळेला मिळालेल्या पुरस्कारामुळे शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत वाशिम स्टेशनला २० कोटी

मुंबई, दि. ११ :- भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. यामध्ये वाशिम स्टेशनचा कायापालट करण्यासाठी २०.३ कोटी रुपयाची मंजुरी देण्यात आली आहे.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार बीजेएसच्या प्रचार रथाचा पालक सचिव यांनी केला शुभारंभ

वाशिम : गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ठ आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण या मृद व जलसंधारण योजनेच्या अंमलबजावणी अभियानासाठी भारतीय जैन संघटनेने तयार केलेल्या प्रचार रथाचा शुभारंभ ११ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पालक सचिव गणेश पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून केला.

यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती लता फड, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, मृद व जलसंधारण अधिकारी श्याम फेरवाणी यांच्यासह भारतीय जैन संघटनेच्या सुजलाम सुफलाम प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक शिखरचंद बागरेचा आदींची उपस्थिती होती. जिल्हा प्रशासन व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त वतीने जिल्हयात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या अभियानाचा गावागावात प्रचार प्रसार करण्याची जबाबदारी भारतीय जैन संघटनेच्या प्रचार रथाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. प्रत्येक गावापर्यंत आपलं गाव जलसमृद्ध करावं, गाव जल आत्मनिर्भर करावं असा प्रचार या रथाच्या माध्यमातून गावपातळीवर करुन जनजागृती करण्यात येणार आहे. प्रचार रथाच्या माध्यमातून तलावाचे पुनरुज्जीवन म्हणजेच गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या अभियानाचा प्रचार गावागावात करण्यात येणार आहे.



# गोभणी ग्रा.पं.वर माजी खा. देशमुख गटाचे वर्चस्व



## भाजपच्या सौ. विद्या सरोदे अविरोध

रिसोड : तालुक्यातील गोभणी ग्रामपंचायत वर सुरुवातीपासूनच मा. खा. अनंतराव देशमुख समर्थक पॅनलचे वर्चस्व राहिलेले आहे.

या पंचवार्षिक मध्ये सुरुवातीला आपसात ठरल्याप्रमाणे आणि सर्वसाधारण कुटुंबाला संधी मिळावी या उद्देशाने सुरुवातीच्या अडीच वर्षासाठी सौ. सविता शेषराव राऊत नंतरच्या सव्वा वर्षासाठी सौ. अश्विनी संदीप घायाळ यांना संधी देण्यात आली होती व आता उर्वरित कालावधीसाठी सौ. विद्या गजानन सरोदे यांची सरपंच पदी अविरोध निवड करण्यात आली.

या सभे करिता मा. खा. अनंतराव देशमुख समर्थक भाजपचे सात सदस्य उपस्थित होते व सर्वानुमते निवड झाली. यासाठी जि प सदस्य अमोल भुतेकर, गजाननराव देशमुख, बाजीराव पाटील हरकळ, मोहन हरकळ, मधुकर साबळे, दशरथ पारेकर, शेषराव राऊत, प्रभाकर घायाळ, मनोहर साबळे, उपसरपंच अशोकराव देशमुख, शे. अतीक शे. लतीफ, भीमराव साबळे, ॲड. राजेश साबळे, संदीप घायाळ, नकुलदादा देशमुख मित्र मंडळ आणि गावकरी मंडळींनी परिश्रम घेतले एका पंचवार्षिक मध्ये सर्वसाधारण आणि संख्येने कमी असलेल्या कुटुंबातील व्यक्तींना नेतृत्व करण्याची संधी मिळाली याबद्दल पॅनलचे व गोभणी वासियांचे कौतुक होत आहे. ता. प्र.